कोणास देत नसत, अगर कोणाच्या कपाळीं लावीत नसत. मशिदींत अहोरात्र पेटलेल्या पवित्र धुनींतील पवित्र रक्षा ते उदी म्हणून सर्वांस देत व सर्वांच्या कपाळीं लावीत हें सुप्रसिद्धच आहे. यावरून बाबा देत असलेली उदी, उद हा पदार्थ जाळल्यापासून झालेल्या रक्षेची नव्हे. असे जर आहे, तर बाबांच्या उदीचे मूळ, उद या परकीय भाषेत नसून, ते संस्कृत भाषेंतच कोठेतरी असलें पाहिजे असे स्पष्ट दिसतें. बाबांची उदी म्हणजे त्यांच्या पवित्र मशिदींत पेटलेल्या धुनींतील रक्षा हे तर सांगितलेच आहे. आता रक्षा या शब्दाचा अर्थ संस्कृतांत काय होतो तो पाहूं. रक्षा या शब्दास संस्कृतात, " भूति भसित, भस्म, व क्षार, " असे प्रतिशब्द आहेत.

भस्म हा पदार्थ अतिपवित्र मानला जातो. भस्में नानाप्रकारचीं मानिलीं आहेत. श्रीशंकरांनीं स्वीकारलेल्या भस्मास चिताभस्म म्हणतात. हें उदापासून झालेलें नसतें ते काष्टें व शुभा यापासून झालेलें असतें, हे सर्वश्रुत आहे. अग्नी होमशाळेंत गाईच्या शुभापासून झालेल्या रक्षेस भस्म म्हणतात. तसेच मोठमोठ्या होमकुंडांत व श्रावणीच्या स्थंडिलांत इंधनें व शुभा यांनीं प्रज्वलित केलेल्या अग्नीपासून उत्पन्न झालेल्या रक्षेसही भस्म म्हणतात. वर लिहिल्याप्रमाणे रक्षेस भूति असे म्हणतात व भूति म्हणजे विभूति, ऐश्वर्य असा अर्थ आहे. यावरून जी रक्षा उच्चपदास नेऊन पोंचविते, जी उच्चैश्वर्य देते, जिचा अंगिकार श्रीशूलपाणी शंकरांनीं केला, जिचा अंगिकार साधुसंत करितात, जी ऐश्वर्यदर्शक, अतएव जी स्नानसंध्यादिकर्में करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें आपल्या कपाळीं व अंगास लाविली पाहिजे अशी शास्त्राज्ञा आहे, तीच रक्षा बाबांची उदी होय असे सिद्ध होतें.

उदी या शब्दांत " उत् " हा उपसर्ग असून " इ " हा धातु आहे. "इ" हा धातु ऱ्हस्व इकारांत व दीर्घ ईकारांतही आहे, व इ किंवा ई या धातूचा अर्थ जाणे-चढणें असा आहे. उत् या उपसर्गाचा अर्थ उच्च, उर्ध्व असा आहे. यावरून उदि किंवा उदी या शब्दाचा अर्थ उच्चपदास जाणें, ऐश्वर्यास चढणें असा होतो व तो वर दिलेल्या रक्षा, भस्म या शब्दांच्या ऐश्वर्यपर अर्थाशीं

मिळता आहे, व बाबांची उदी उदाच्या रक्षेची नसून, वर लिहिलेल्या रक्षेची आहे हे वर दाखविलेच आहे. यावरून बाबाची उदी संस्कृत उदि किंवा उदी याच शब्दापासून निघालेली आहे. व तिचा अर्थ भक्तभाग्याचा उदय करणारी ती उदी असाच असला पाहिजे असे मला वाटतें. आपल्यात "उदो उदो" किंवा उदयोस्तु उदयोस्तु असें म्हणून कपाळीं देवाची रक्षा लावण्याचा प्रघात आहे. कोल्हापूरच्या अंबाबाईचे किंवा तुळजापूरच्या भवानीचे भुत्ते तोंडाने उदो उदो म्हणून भिक्षा घालणाऱ्या मनुष्यास हातानें रक्ष, विभूती, किंवा भस्म लावतांना आपण नेहमीं पाहातों. यावरून बाबांची उदी या शब्दाचा अर्थ उदय करणारी असा असून ती संस्कृत "उद् +इ किंवा ई" या शब्दापासून निघाली आहे व उद् या परकीय भाषेतील शब्दापासून तिचा जन्म खात्रीनें झालेला नाहीं, असें मला वाटते.

बाबा जसे अतुल ऐश्वर्यवान व सामर्थ्यवान् आहेत तशीच त्यांची उदीही अतुल ऐश्वर्यवती व सामर्थ्यवती आहे. उदी प्रभावासंबंधानें आजपर्यंत शेंकडों जणांचे शेकडों अनुभव श्री साईलीलेंतच प्रसिद्ध झाले आहेत, होत आहेत व पुढेहि होतील. उदीच्या अंगीं जरी अलौकिक किंवा असामान्य सामर्थ्य असलें, तरी भक्तकार्य त्यांच्या मंद, तीव्र किंवा अनन्य श्रद्धेवरच अवलंबून राहाणार हें उघडच आहे. बीज अव्वल दर्जाचें आहे, परंतु ज्या जमिनींत तें पेरावयाचे आहे ती जमीन जर साधारण असली, तर त त्याच बीजापासून येणारें पीक अव्वल दर्जाचें येणार नाहीं, त्याचप्रमाणें उदी-प्रभावाच्या दर्जास जेव्हां तितक्याच दर्जाच्या भक्तश्रद्धेची जोड मिळेल, तेव्हांच उदी भक्ताचे अव्वल दर्जाचें काम करील, म्हणजे त्यांस मोक्षपदास नेईल; परंतु हा उदी-प्रभावासंबंधानें पारमार्थिक भाग झाला. प्रापंचिक कार्यांतहि तोच नियम लागू पडतो. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अनुभवावरून उदी माईनें भक्तश्रद्धेप्रमाणें त्यांचीं कमी जास्त महत्वाची कार्यें केलीं आहेत, ज्याची अनन्य श्रद्धा त्याच्या प्रपंचाचा सर्व भारच उदी माईवर पडतो. "अनन्याश्चिंतयंतोमां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योग क्षेमं वहाम्यहम् ॥ भगवद्गीता अ. ९ ॥ श्लो. २२ वरील

श्लोकांत श्रीकृष्ण परमात्म्यांनीं त्यांच्या ठिकाणीं असलेल्या अनन्य श्रद्धेच्या भक्ताच्या योगक्षेमाबद्दल जो अद्वितीय सिद्धांत सांगितला आहे, तोच तंतोतंत उदी माईसंबंधानेहि लागू पडतो. त्याचप्रमाणे—

"ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्" । हाही सिद्धांत परमात्म्या बाबाच्या ठिकाणीं जितका लागू पडतो, तितकाच उदीमाईचे ठिकाणीं लागू पडतो. बाबांनीं आपली दिव्य जादू उदीमाईंतच घालून ठेविली आहे. बाबानीं आपले अमानुप अधिकार दिसण्यांत अचेतन दिसणाऱ्या उदीमाईस दिले आहेत. उदीमाई दिसण्यात अचेतन दिसली, तरी ती सचेतन आहे. ती इतर रक्षेसारखी रक्षा नव्हे. तिचा जन्म संत-चक्रवर्ती बाबाच्या पवित्र मशिदी-तील पवित्र धुनींत झालेला आहे. ती बाबाची प्रेममुर्ती आहे. ती बाबाची प्यारी आहे. बाबांच्या दिव्य करकमलांनीं व पुण्य नेत्रकमलांनीं तिच पोपण झालेलें आहे. बाबांची मानव तनू जरी अदृश्य झाली, तरी बाबांनीं दिलेल्या अधिकाराची पूर्णपणे अंमलबजावणी करण्यास व भक्तकार्य करण्यास ती केव्हाही तयारच आहे. भक्तांनीं मात्र ती बाबाच आहे असें समजून, तिला अनन्यभावनें शरण गेलें पाहिजे. तिच्यावर सर्वस्वी आपला भार टाकला पाहिजे व तिच्या ठिकाणीं पूर्ण निष्ठा ठेविली पाहिजे. म्हणजे ती खात्रीनेंच भक्ताचे इह-परलोकीं कार्य केल्यावांचून राहाणार नाहीं, अशी माझी अल्प समजूत आहे.

* *

नुकत्याच तीनचार दिवसांपूर्वीं संपलेल्या ज्येष्ठ महिन्यांत माझ्या घरीं ठाणे येथे माझ्या धाकट्या बंधूच्या कन्येची पुतणी श्रीमती सौ. चंपूताई खांडेकर (ऊर्फ सौ. मनोरमाबाई खेर) या आपल्या दोन लहान कन्येसह आमची पुतणी सौ. माई खांडेकर हिच्याबरोबर तीनचार दिवस सहज मजेनें आल्या होत्या. आम्ही सर्व मंडळी जेवणखाण आटोपून रात्रीं गोष्टी बोलत बसलों होतों. बाबाच्याच गोष्टी चालल्या होत्या. त्या वेळीं सौ. चंपूताईनीं बाबांच्या उदी-

संबंधानें त्यास आलेला एक सुंदर व मननीय अनुभव सांगितला, तो मी जसाच्या तसाच आपणांकडे पाठवीत आहें:—

त्या म्हणाल्या-सुमारे दोन वर्षांपूर्वी मी माझ्या हल्लीं असलेल्या शकुंतला नांवाच्या लहान मुलीच्या वेळीं आपल्या सासरीं जबलपुरास बाळंतीण होतें. मला तेराचौदा वर्षें फीट् (फेफरें) येते. या बाळंतपणांतही फेफरें येत असल्यामुळे मी अत्यवस्थ आजारी झाले. माझ्या देहाचा मला भरंवसा वाटेना. निदान अशा स्थितींत माझ्या आईने तरी मला भेटावें, अशी मला बळवत्तर इच्छा झाली; परंतु आई त्या वेळीं कोपरगांव येथें माझ्या वडिलांजवळ होती. जबलपुराहून कोपरगांव फार लांब. कोपरगांव हें तालुक्याचें ठिकाण असून नगर जिल्ह्यांत आहे. श्रीसाई बाबाच्या शेरडीपासून तें आठनऊ मैलांवर. श्रीगोदातटाकीं आहे. आई लांबच्या पल्ल्यावर असल्यामुळें आतां कशाची भेटते असे वाटूं लागले; तरी पण तिला पत्र घातले तर ती तावडतोब निघून येईल, असें वाटल्यावरून तिला, विलंब न करितां तूं जरूर निघून ये असें पत्र घातलें. माझी आई; वडील व आजोबा वगैरे मंडळी त्या वेळीं नुकतीच शेरडीस जाऊन बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन आली होती. माझ्या अत्यवस्थ आजारीपणाचें पत्र आईस मिळताच ती घाबरली, तिला धीर निघेना, तिनें जबलपुरास येण्याचा बेत केला, इतक्यात पहांटेस तिला एक स्वप्न पडलें कीं, एक रेडा माझ्यामागें लागला आहे, मी पुढें पळत आहे व तो माझ्यामागें धांवत आहे. मी तर घाबरलेंच, पण आईही हें पाहून अतिशय घाबरली. अशा स्थितींत काय करावें हे आम्हां दोघींसही सुचेना, इतक्यात श्रीसाईबाबा तेथें आले व आईस म्हणाले, "घाबरूं नकास. तो रेडा कांहीं करणार नाहीं. तो आतां निघून जाईल." असें म्हणून बाबांनीं उदी आईचेजवळ दिली. आईनें ती उदी माझ्या कपाळीं लाविली व बाबा अदृश्य झाले. आई जागी झाली. तिचा बाबांच्या उदीवर पूर्ण भरंवसा. तिला वाटलें आतां मला आराम पडेल, विघ्न टळलें. आतां जबलपुरास जाण्याची इतक्यांत घाई करूं नये. इतक्यांत चमत्कार असा झाला कीं, मला खरोखरच अतिशय आराम पडला. भीति व तळमळ नाहींशी झाली, व आईस

येथवर येण्याची तसदी कशास घावी, असें वाटून आम्हीं आईस तसेच पत्र घातलें. आईस तें ताबडतोब मिळालें. पत्र पाहातांच तिला अत्यानंद झाला. बाबांच्या उदीचे व बाबांचें परम कौतुक वाटलें. बाबानीं स्वप्नांत उदी देऊन, मला रेडारूपी यमधर्मराजाच्या जबड्यांतून वांचविले याबद्दलही तिला कल्पने-बाहेर धन्यता वाटली. जबलपुरास येऊन मला भेटण्याचा बेत आईने अर्थातच रहित केला. स्वप्नांतील उदीचा जर एवढा प्रभाव आहे, तर खरोखर जागृति-अवस्थेत उदीमाईचें नित्य सेवन केल्यास ते मुक्त पदास का नेऊन पोहोचविणार नाहीं, निःसंशय पोहोंचवील. बाबा या चर्मचक्षूंस अदृश्य झाले असतांही कोठें, कसे व काय चमत्कार करून भक्तश्रद्धा जागृत ठेवीत आहेत, ही गोष्ट विचार करण्यासारखी असून निरंतर लक्षात बाळगण्यासारखी आहे.

---

## शार्दूलविक्रीडित.

बाबा कल्पतरू, सदा प्रियकरू, भक्तां कृपासागरू ।
बाबा दंडधरू[1], खलां[2] सुखरू, योगीजनां शंकरू ॥
बाबा शार्ङ्‌धरू, भवाब्धिपतिता, सत्कर्णधारू नरू ।
बाबा दत्तगुरू,-नमो ममतया, सर्वेश्वरू सद्गुरू ॥ १॥

सन १९२४ साल्च्या डिसेंबर महिन्यांत एके दिवशीं मी नित्याप्रमाणे सकाळीं ठाणे जेलांत स्पेशल केसचें काम चालविण्याकरितां सकाळीं ११ वाजतां जाण्यास निघालों, इतक्यांत माझ्या शिपायानें मला सांगितलें कीं, मामलेदार कचेरींतील विठू जानू लाड, शिपाई एकाएकी आज सकाळपासून अत्यावस्थ आजारी झाला आहे. त्याच्या सर्वांगास नखशिखांत विंचवानें नांगी मारल्याप्रमाणें भयंकर वेदना होत आहेत. सकाळपासून डॅाक्टर व वैद्यांचे पुष्कळ उपाय झाले, वेदना बिल्कूल बंद पडत नाहींत, नुसती तडफड चालू आहे. त्याचे वयही झालें आहे. तो आतां जगेल असें दिसत नाहीं. त्यानें

१ यम. २ दुष्टांना.

तुम्हांस निरोप सांगितला आहे कीं, मी आतां मरतों, जगण्याची आशा मुळींच दिसत नाहीं. वेदना माझ्यानें आतां सहन होत नाहींत. मी सारखा तडफड तडफड करीत आहें. माझा तुम्हाला हा शेवटचाच रामराम आहे. इतक्यांतूनही तुम्हांस कांहीं दवा माहित असल्यास मला त्वरीत पाठवून द्या व मला गरिबाला या यातनेतून सोडवा.

विठूला काय भावना झाली आहे, हें मी पाहिलें नव्हतें. तशांतून जरी मी पाहिले असते तरी मी वैद्य किंवा डॉक्टर नसल्यानें मला त्याच्या रोगाचा कांहीं उलगडा झाला नसता. शिवाय त्यानें वैद्य डॉक्टरांचे उपाय शक्य तितके केले, मग मी यःकश्चित मनुष्य त्यांच्यापुढें काय करणार ? विठू हा माझ्या नेहमींच्या ओळखीचा.मला त्याची फार कींव वाटली,परंतु मी करणार काय ? मला फार वाईट वाटले; परंतु अशा प्रसंगीं काय करावें हें सुचेना. इतक्यांत मला आठवण झाली कीं, माझ्या खिशात बाबांच्या उदीची पुडी आहे.मी त्या पुडींतील थोडीशी उदी काढून ती माझ्या शिपायाजवळ दिली, व त्याला सांगितलें कीं, प्रथम या उदीस नमस्कार करण्यास विठूस सांग. व नमस्कार केल्यानंतर त्यापैकीं कांहीं उदी पाण्यात घालून त्याला पाज व कांहीं त्याच्या सर्वांगास लाव, व कसें वाटते तें मला कांहीं वेळानें कळीव. याप्रमाणें त्यास सांगून त्याला विठूकडे पाठविले. माझ्या शिपायानें त्याप्रमाणे करून, तो लागलाच परत आला व नंतर आम्हीं दोघेहि ऑफिसांत गेलो. सायंकाळपर्यंत काम केल्यानंतर आम्हीं घरीं आलों. जरी मी काम करीत होतो, तरी विठूचें कसें असेल, कोण केव्हां काय बातमी सांगेल, याची प्रतिक्षणीं धास्ती वाटतच होती बाबांची लीला अगाध. उदीमाउलीचा प्रभाव विलक्षण. आम्ही ऑफिसांतून घरीं येईपर्यंत आम्हांस विठू-बद्दलची कोणी कांहींच माहिती सांगितली नाहीं. मी लागलेंच शिपायास त्याच्याकडे जाऊन काय खबर आहे ती मला येऊन कळीव म्हणून सांगितले. चमत्कार हा कीं, माझा शिपाई त्याच्याकडे जाऊन परत आला, व मला सांगू लागला कीं, विठोबा चांगला खडखडीत बरा झाला. उदी लाविल्यानंतर लवकरच त्याच्या वेदना थांबल्या, व त्यास बरें वाटूं लागलें. मी आज महारा-

जांच्या उदीमुळे वांचलों, माझा पुनर्जन्म झाला. त्याने तुम्हांस फार फार रामराम सांगितला आहे. गुरुरायाची काय अद्भुत करणी! उदीमाऊलीचे काय निरूपमेय ऐश्वर्य व सामर्थ्य! खरोखरच २४ तास प्रपंचाच्याच नादीं लागून राहिल्यामुळे अमोल ऐश्वर्यशक्तीला भास आम्ही कसे आचवतों, व आजपर्यंत शेंकडो हजारों वरप्रमाणे अनुभव वाचूनही आमचें लक्ष श्रीगुरुरायाचे पदाब्जीं कसे लागत नाहीं काण जाणे. अनंत जन्मीच्या दुष्ट संस्कारांचेंच हे फल समजले पाहिजे. त्यांच्या चरणीं लक्ष लागण्यास व त्याच्या उदीवर श्रद्धा बसण्यास त्यांचीच कृपा पाहिजे, व त्याची कृपा होण्यास त्याना अनन्यभवाने शरण गेलें पाहिजे त्याखेरीज अन्य मार्ग नाहीं.



# महाराजांचे अनुभव.

माझ्या शेजारीं राहणाऱ्या श्रीमती वेणूताई भागाशे ह्या बाबांच्या भक्तांपैकीं एक अप्रतीम श्रद्धाळू भक्त आहेत. अलीकडे बहुतकरून प्रत्येक महिन्यास काहींना काहीं तरी फूल ना फुलाची पाकळी म्हणून त्या बाबांच्या कायम फंडास आपल्याकडे पाठवीत असतात हे आपल्यास माहीत आहेच; व याबद्दल आपलें दोनचार वेळां बोलणेंही झालें होतें. त्यांचा व बाबासंबंधीं त्यांना प्रतक्षणीं येत असलेल्या सुंदर अनुभवांचा श्रीसाईभक्तांस परिचय करून देण्याचे योजिलें आहे.

वेणूताई ह्या इकडील प्रांतांत उत्तम नांवाजलेल्या पाकशास्त्रनिपुण, सदाचारी, सुशील, निरलस, दक्ष, चोख वर्तनाच्या, व साधुसंतप्रेमी अशा एक बाई आहेत. त्यांना श्रीयुत दत्तात्रय ऊर्फ धोंडोपंत या नांवाचे एक २०-२२ वर्षांचे चिरंजीव,व सौ. बयोताई या नांवाची एक २३-२४ वर्षांची कन्या अशीं दोनच अपत्ये आहेत. धोंडोपंतांस दरमहा ४० रु. पगार मिळतो. व वेणूताईसहि लग्नकार्य व हव्यकव्याच्या मानाप्रमाणें त्यांच्या पाकनिष्पत्तीच्या कामांत थोडीफार प्राप्ती होते. त्यांनीं विद्याभ्यासाकरितां आपले जवळ नातलगांची एक दोन मुलेंहि बाळगलीं आहेत. ठाण्याची वस्ती, भाडें फार, दूध फाटी महाग, व इतर संसाराच्या जिनसाहि महागच; अशा स्थितींत महिन्याचीं दोन तोंडें, जमतेम कशींबशीं मिळवावयाचीं, केव्हां रमारमी, तर केव्हां लोकांचे दोन पैसे देणेंहि होतें. बयोताईचीहि अशीच स्थिति. त्याहि वेणूताईकडे कधीं कधीं बाळंतपणाकरितां म्हणून म्हणा, अगर माहेरपणाकरितां म्हणून म्हणा असावयाच्याच. वेणूताईची ही परिस्थिती वर्णन करण्याचें कारण इतकेंच कीं, बाबाच्या उदीवर, व बाबांवर अनन्यभावानें श्रद्धा ठेवणाऱ्या भक्तांस भक्तवत्सल बाबा कोणत्याहि स्थितींत विसरत नाहींत. इतकेंच नव्हे तर संकटसमयीं त्यांच्या हांकेसरसे धांवून येतात, व त्यांचें संकट निवारण करितात व त्यांची अब्रू राखतात.

बाबांची कीर्ति वेणूताईंनी १०–१२ वर्षांपूर्वीच पुष्कळांच्या मुखांतून ऐकिली; व बाबांच्या लीलाहि त्यास पुष्कळ ऐकावयास मिळाल्या. साहाजिकच अशा सगुण परमात्म्याचें एक वेळ दर्शन व्हावें अशी त्यांना उत्कट इच्छा झाली; परंतु प्रापंचिक अनेक अडचणीमुळे त्यांना शिरडीस जातां येईना त्यांची इच्छा वरपांगी नव्हती. ती अंतःकरणापासून होती व सर्वज्ञ प्रभूस त्याची जाणीव होता. वेणूताईंनीं जागृतावस्थेत बाबांचा जो फोटो पाहिला होता, त्याबर-हुकूम बाबांच्या मूर्तीचें दर्शन त्यांना ८–९ वर्षांपूर्वी स्वप्नांतच शिरडीस जाऊन झालें. स्वप्नांत कां होईना, पण बाबांचे दर्शन झालें, याबद्दल त्यांना अत्यानंद झाला, बाबांवर त्यांची भक्ति बसली. त्या वेळीं त्यांना वरील स्वप्नाखेरीज प्रत्यक्ष असा बाबाचा अनुभव कांहींच आला नाहीं; पण अलीकडे मात्र त्यांना बाबांचें अनुभव पदोपदीं येतात व त्यांचें त्यांना अत्यंत कौतुक वाटते. त्यांनीं सांगितलेले उदीचे अनुभव त्यांच्याच शब्दांत तूर्त खालीं देत आहें.

सुमारें दोन वर्षांपूर्वी माझी मुलगी सौ. बयोताई लेले ही गरोदर असून, तिला दुसऱ्या महिन्याचे आठ पंधरा दिवस गेल्यावर डोहाळे लागले. त्यांत तिला रक्ताच्या उलट्या होऊं लागल्या. अन्नपाणी मुळींच जिरत नसे. अशा स्थितींतून ती वांचेल असे कोणासच वाटलें नाहीं. त्या वेळीं ती मुंबईस होती. मी तिला ठाण्याला आणली. बाबांच्याबद्दल फक्त कीर्ती ऐकलेली, पण प्रत्यक्ष अनुभव नाहीं. एके दिवशीं मनांत आलें कीं, सौ. बयोताईस बाबांची उदी तरी लावून पहावी, म्हणून मी शेजारींच देवं मामलेदार राहातात त्यांच्याकडून उदी नेऊन ती सौ. बयोताईस लाविली. काय चमत्कार कीं, सौ. बयोताईस लागलीच त्यांच्याचकडची थोडीशी भाकरी खावी अशी इच्छा झाली व काकूं-कडून मला थोडीशी भाकरी घेऊन ये असे ती म्हणाली. मी त्याप्रमाणें काकूंना सांगितलें, काकूंनीं भाकरी दिली. व ती सौ. बयोताईने खाल्ली. त्या दिवसापासूच सौ. बयोताईची ओकारी साफ राहिली व तीस अन्नपाणी चांगलेच जिरूं लागले. कांहीं दिवस ठाण्यास राहून, नंतर ती पुन्हा मुंबईस आपल्या घरीं गेली. आठव्या महिन्यांत एके रात्रीं ती एकाएकीं घाबरली व

बेफाम झाली. तिच्या यजमानानीं मला तार केली कीं, तुम्ही तातडतोब निघून या. परंतु मी मुंबईला जाण्यापूर्वी सौ. बयोताईला उदीची आठवण झाली व मला बाबाची उदी लावा असें त्या म्हणाल्या. त्याप्रमाणे बाबाची उदी त्याना लाविली. उदी लावतांक्षणींच त्यांचा घाबरेपणा व बेफामपणा पार नाहींसा झाला व त्यास चागलेच बरें वाटूं लागले. इकडे तार वाचून माझी घाबरगुंडीच झाली. मी भीत भीत जों मुंबईला जाते तो सौ. बयोताई चांगली. तेव्हा तार करण्याचे कारण काय असे मी तिला विचारिलें. तिने झालेला सर्व प्रकार सांगितला. तेव्हां बाबांच्या उदीचा प्रभाव आम्हां सर्वांस कळून आम्हा सर्वांस बाबांचें व त्यांच्या उदीचे अतिशय कौतुक वाटले. नंतर थोडयाच दिवसांनीं मी तिला ठाण्यास बाळंतपणाकरितां घेऊन आले. तिचें पोट दुखूं लागले. बाळंतपणाची संधी व मूळ नक्षत्र लागण्याची संधी एकच आली. आम्हां सर्वांस धाक पडला कीं, आता मूल मूळ नक्षत्रावर जन्मणार. पण उपाय काय ! एकच उपाय सुचला व तो हा कीं बाबांची उदी लवावी. मग बाबांच्या मनात जें असेल तें ते करतील. त्याप्रमाणें उदी लाविली. चमत्कार हा कीं, सौ. बयोताई मूळनक्षत्र संपून गेल्यावरच बाळंतीण झाली. अरिष्ट टळलें. बाबांची कृपा ! परमात्म्याची कृपा ! उदीमाऊलीची कृपा ! बाबांच्या कृपेची व उदीमाऊलीच्या कृपेची मी काय तारीफ करू ! मी तिचें काय वर्णन करूं ! माझ्या मनाला त्याबद्दल काय वाटते, तें नीटपणे सागण्यास मला शब्द सुचत नाहींत ! बाबांची करणी अघटित आहे ! उदीमाऊलीचें सामर्थ्य अतर्क्य आहे ! मी जरी तुम्हांस ही हकीगत सांगत आहे तरी माझ्या अंतःकरणांत काय चाललें आहे त्याची खरी जाणीव मला तुम्हांस करून देतां येत नाहीं ! त्या साईप्रभूची लीला अगाध आहे ! असो ! पुढें सौ. बयोताईच्या बाळंतपणांत कांहीं एक त्रास झाला नाहीं. एकदोन महिन्यानीं मुलासहवर्तमान मुंबईस सुखरूप गेली. नंतर सौ. बयोताईचा मुलगा ६ महिन्यांचा झाला तेव्हां व १० महिन्यांचा झाला तेव्हां त्यास ताप आला. पहिल्या वेळीं मुलास ताप येणार आहे, असें कोणी अगोदरच सांगितल्याचा भास झाला. त्याप्रमाणें तापहि आला, व बाबांचें नांव घेऊन उदी लावल्याबरोबर दोनतीन दिवसांत गेला. दुसऱ्या वेळीं म्हणजे १० व्या महिन्यांत प्रत्यक्ष बाबांच

सौ. बयोताईच्या स्वप्नातच आले व म्हणाले " चोर येणार आहे, दहाबारा दिवस जपावयास पाहिजे. " ती घाबरली, तिला याचा अर्थ कळेना. इतक्यात मुलास तापाने पछाडिले. मुलगा तापानें जेर झाला. चौदा दिवसांच्या मुदतीचा ताप होता. त्या वेळीं डॉक्टरला बोलाविले, परंतु काम बाबांच्या नामस्मरणानें व उदीमाऊलीनेंच केले. डॉक्टरची विझिट फी ५ रु. व शिवाय औषधाचे बिल हें सौ. बयोताईस कसे झेपणार ? परंतु भक्तवत्सल बाबांनीं एका डॉक्टराच्या मनांत प्रेरणा केली त्याचे सर्व बिल ४०-५० रु. झालें; परंतु मुलगा माझा आहे तुम्ही फीची व बिलाची फिकीर करू नका असें म्हणून कधीं कधीं तर डॉक्टर दिवसांतून दोन तीन वेळांही येत. तापाची मुदत संपली. मुलगा बरा झाला. डॉक्टरनें फक्त ७ च रु. घेतले. व मला आतां कांहीं जास्त नको म्हणून सांगितलें. काय या परमात्म्याची अगम्य लीला ! गरीब भक्ताकरितां कसा धांवून येतो ! त्याचे अंतःकरण कसे कळवळते ! कोणाच्या मनांत कशी प्रेरणा करतो व संकटसूचना कशी देतो व त्या संकटांतून कसा तारता याची कल्पना ज्याची त्यालाच ! अनुभवावांचून ती दुसऱ्यास कशी यावी ? साईविभूच्या अगम्य लीलेपुढे मति कुंठित होते. त्यांस अनन्यभावाने शरण जाऊन त्यांच्या चरणकमलीं मस्तक ठेवून त्यांस वंदन करावे ! यापेक्षां मी जास्त काय करूं ! हल्लीं ता मुलगा १३ महिन्याचा झाला आहे व त्यास कांहीं होऊं लागलें कीं आम्हीं त्याला उदीच लावतों व उदीनेंच गुण येतो.

चि. सौ. बयोताई गेल्या वर्षी श्रावणाच्या महिन्यांत ठाण्याहून मुंबईस गेली;पण त्या वेळीं तिला असा विचार पडला कीं, मुंबईस जाऊन करावे काय ? कारण तिच्या यजमानांनीं चार महिने नोकरी सोडून दिली होती. नोकरीवांचून तर उदरनिर्वाहास दुसरें साधन नाहीं. मुंबईसारख्या शहरांत रहावयाचें ! तेथें सर्वच महाग ! तें शहर म्हणजे श्रीमंतांकरितां आहे, गरिबांकरितां नाहीं. तशांतून कांहीं नोकरी अगर उद्योगधंदा असेल तर कांहींतरी निर्वाह होईल, नाहीं तर निव्वळ उपासमार होईल. सौ. बयोताईच्या यजमानांनीं नोकरी सोडून दिल्या-मुळें तिची जवळ जवळ तशीच स्थिति झाली होती. तिला फार वाईट वाटू

लागले. डोहाळ्याच्या व बाळंतपणाच्या त्रासांतून व मुलाच्या दुखण्याच्या यातनेंतून बाबांनीं सोडविल्याबद्दल एकप्रकारें तिला आनंद होत असूनही, यजमानानीं नोकरी सोडून घरीं बसल्याबद्दल तिला दुसरे प्रकारें अत्यंत चिंता वाटूं लागली. मुबईस जाऊन खावयाचें काय ? नवीन झालेल्या तान्हुल्याचें संगोपन करावयाचें कसें ? याप्रमाणें नानाप्रकारच्या विकल्पांनीं तिच्या मनांत काहूर करून सोडलें. मी आई खरी, पण मी तरी तिला आपल्या घरीं किती दिवस ठेवून घेऊं ? माझी स्थिति वर वर्णन केलेलीच आहे. सौ. बयोताई मुंबईस जावयास निघाली. जाते वेळीं तिनें आपला मुलगा फोटोंत असलेल्या बाबांच्या पायावर घातला व आपण त्या फोटोस वंदन केलें. व मनांतल्या मनांत बाबांस म्हणाली कीं, " बाबा, माझी सर्व स्थिति आपण जाणतच आहां ! माझा व या मुलाचा प्रतिपाळ आपल्यावांचून कोण करणार ! आईच्या घरीं तरी मी किती दिवस राहूं ? व मुंबईस जाऊन तरी काय करूं ? आपल्यास माहीतच आहे कीं, माझ्या घरातील मंडळींनीं नोकरी सोडून ते रिकामे बसले आहेत व दुसरीकडून कवडी मिळण्याचीही आशा नाहीं. आपल्यावांचून माझा वाली कोण आहे ? मी आतां यापेक्षां आपल्यास जास्त काय सांगूं ? आमची लाज राखा व आमचा सांभाळ करा !" याप्रमाणे मनांत बोलून बाबांना पुन्हां वन्दन करून चिंताग्रस्त स्थितींत ती मुलासह मुंबईस गेली. खरोखरच करुणाघन साईमाउलीचें अंतःकरण कळवळलें, व सौ. बयोताई मुंबईस जाते तोंच दुसरे दिवशीं तिच्या यजमानांस नोकरी लागली. ते डबल ड्यूटी करूं लागले व सौ. बयोताईची सर्व काळजी दूर झाली. खरोखरच बाबा दूर नाहींत, जवळ आहेत. आपण सर्व भार त्यांच्यावर टाकल्यास ते आपली उपेक्षा करीत नाहींत. बाबांच्या या चमत्काराचें मला अति आनंदाश्चर्य वाटतें.

## वृत्त-पृथिवी

वृथा शशिप्रभा न जों नभि अनंत तारागणें ।
वृथा सुरतरू न जों जगति कोटि वृक्षांगणें ॥

तथा जंव न केलिया सदय साइनारायणें ।
कृपा तव वृथा वृथा शतसहस्र पारायणें ॥

प्रसिद्ध ललितकलादर्श नाटक कंपनीचे हल्लीचे उत्साही मालक श्रीयुत व्यंकटराव पेंढारकर यांनी ता. २५ नोव्हेंबर १९२५ रोजीं रात्रौ मुंबई येथे बाम्बे थिएटरांत 'राक्षसी महत्वाकांक्षा' या नांवाच्या नाटकाचा धर्मार्थ प्रयोग करून त्याचें उत्पन्न बाबाच्या कायम फंडास मदत म्हणून दिले. त्या वेळी बाबांच्या भक्तवृंदापैकी पुष्कळ उत्साही तरुण व वृद्ध मंडळी तिकिटे खपविण्याची आगाऊ खटपट करीत होती. प्रथम मी माझ्या शक्तीप्रमाणे एक ०-९-० आण्याचे तिकीट घेण्याचेच ठरविलें. धोंडू घरीं नव्हता. तरीपण घरांत असलेल्या सर्व मंडळीकरितां तिकिटें घ्यावीं असे मागाहून मनात आलें. व धोंडूच्या येण्याची वाट न पहाता किंवा त्याचा या बाबतींत कसलाही विचार न घेतां मीं एकंदर ६ रु. ३ आ. ची तिकिटे घेतलीं. माझ्या ऐपतीच्या व धंद्याच्या मानाने पाहातां ही रक्कम खरोखरच मला फार जड होती. पण मला कोणी आग्रह केला नव्हता. केवळ मी आपल्या खुशीनेंच इतकीं तिकिटे विकत घेतलीं, पैसे देऊन टाकले. व पहाते तों घरांत अवघे २ रु. १३ आ. शिल्लक. धोंडूचा पगार अवघा ३२ सच रु. व तोही पुढील महिन्याच्या ३-४ तारखेस येणार ! म्हणजे इतक्या मंडळीच्या दिनचर्येच्या खर्चाचा निभाव जवळजवळ १५ दिवस २ रु. १३ आ. त लागावा कसा ? तिकिटाचे पैसे तर देऊन चुकलें ! जीव घुळबुळ करूं लागला. कांहीं सुचेनासें झालें. एक वेळ वाटे कीं, हीं घेतलेलीं तिकिटे विकून टाकावीत. पुन्हा वाटे, छे, विकून टाकूं नयेत. हीं बाबांच्या फंडाच्या मदतीसाठीं घेतलीं आहेत. बाबा आपली १५ दिवस कशी तरी व्यवस्था करतील. पुन्हां वाटे कीं, छे, ही आपण चूकच केली. आपण मूर्ख आहोंत. आपण आपल्या आध्यापेक्षां जास्त खर्च कां करावा ? पुन्हां वाटे कीं, हा खर्च बाबांच्या कारणीं पडतो आहे यांत ; वावगें काय आहे ? बाबा सर्व कांहीं जाणतात. त्यांनीच ही बुद्धि दिली आहे. व त्याप्रमाणेंच मी हा खर्च

केला आहे. मग ते माझी साथ का नाहीं लावणार ? असे एक ना दोन, हजारो तरंग मनात येऊं लागले. धोंडू घरीं आल्यावर त्यास ही हकीगत सांगितली. तो म्हणाला—"काहीं हरकत नाहीं. बाबांच्याकडेच पैसे जातात ना ? जाऊं दे. कांहीं वाईट वाटण्याचें कारण नाहीं. परतु तूं ही तिकीटें कशाला घेतलीस ! तसेंच ६ रु. ३ आ. का दिले नाहींस ? आपण कोठें नाटकाला जाणार आहोत ? तिकीटे घेतली नसतीस, तर या तिकिटाची त्यांना दुसरीकडून आणखी किंमत मिळाली असती. असो. आता झालें तें झाले !" माझी तळमळ दोन दिवस राहीना. त्या महिन्यांत फार तर मला दत्तजयंतीच्या कामाचे १८ रु. मिळावयाचे. दुसरीकडून काहींही मिळण्याची आशा नव्हती. परंतु भक्तवत्सल गुरुमाऊलीची लीलाच काहीं अजब ! तो महिना फारसा लग्नकार्याचा नसतां, व ज्या ठिकाणचीं कामें मजकडे कधींही यावयाचीं नाहींत,- अशी परिस्थिती असतां, मला त्याच महिन्यांत अनपेक्षित अशीं पुष्कळशी कामें येऊन त्या ८--१० दिवसांतच मला ११२ रु. मिळाले. इतकेंच नव्हे, तर मला थोडेबहुत जे लोकचे देणे झाले होतें त्याचाही थोड्याच दिवसात निकाल लागला. मग आमचा सर्वांचा आनंद काय विचारावा ? आम्हीं बाबांच्या अतर्क्यकरणीचें कौतुकच करीत बसलों. एक दाणा पेरला म्हणजे त्यास जसे अगणित दाणे येतात तसेच हे ६ रु. ३ आ. बाबांच्याकडे दिल्यावर बाबानीं त्याच्या कितीतरी पट रुपये मला दिले असें मला वाटूं लागलें. खरोच ती साईमाऊली फार धन्य ! तिचे अनुभव मीं सांगू लागलें म्हणजे मला फार प्रेम येतें, पण तें कसें तें मला सांगता येत नाहीं.

यांप्रमाणे श्रीमती वेणुताईंनीं सांगितल्याप्रमाणें त्यांचे अनुभव मी साई-भक्तांपुढे ठेविले आहेत. त्यांचेजवळ आणखीही बरेच अनुभव आहेत. परंतु त्या, सवडीप्रमाणें ते पुढें सांगणार आहेत. अनंतकोटि ब्रम्हांडनायकी सूत्रधार बाबा कोठें, केव्हा, कशारूपानें कोणाजवळ असतील त्यांची कल्पना करतां येणें शक्य नाहीं. त्यांच्या लीला कल्पनातीत आहेत.

असो. आतां मी कै. नानासाहेब चांदोरकर यांनीं सांगितल्यापैकीं एक-दोन अनुभव लिहितो.

पूर्वी बरेच वेळां लिहिलेलेच आहे कीं, बाबा नानासाहेबांजवळ प्रथम प्रथम स्पष्ट व मनमुराद बोलत असत. बाबांना प्रख्यातीस आणण्यास व त्यांची कीर्ति वाढविण्यास नानासाहेबच कारणीभूत आहेत, असें म्हणण्यात अतिशयोक्ति होणार नाहीं. बाबा मूळचेच अमोल रत्न. परंतु हे रत्न शिरडीसारख्या लहानग्या गावात पडले असल्यामुळे त्याची किंमत कोण करणार ? " न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत् ' या प्रसिद्ध पंडितमणिकालिदासोक्तिप्रमाणे आपल्या परीक्षकाचा शोध करण्याकरिता रत्न कधीं त्याच्याकडे जात नाहीं. परीक्षकच त्याच्या शोधार्थ त्याजकडे जातो. त्याचप्रमाणे आपण कोण हे समजावून देण्याकरितां बाबांना दुसरीकडे जाण्याची काय जरूर ? ज्याला रत्नाची पारख व जरूर असेल तो येईल त्याच्याकडे. ही गोष्ट यद्यपि खरी असली, तरी बाबाचा व नानासाहेबांचा पूर्व जन्मीचाच कांहींएक निराळा संबंध होता व त्यामुळे बाबांनीं तुला एकवेळ बोलाविलें आहे असा निरोप नानासाहेबांस सागण्यास बाबानीं शिरडीचे कै. अप्पा कुलकर्णी यांस सांगितल्याचे वाचकाच्या लक्षात असेलच. बाबांचें दर्शन नानासाहेबास झाल्यावर पुढे नानासाहेबांना काहीं अनुभवानंतर बाबांचा इतका नाद लागला कीं, त्यांस बाबांवाचून चैन पडत नसे. जिथे तिथें त्यांस बाबाच दिसत. ज्याला त्याला ते बाबांच्याच कथा सांगत. भक्तशिरोमणि विद्वद्रत्न चतुर्भाषाकोविद त्रिगुणित पदवीधर कै. काकासाहेब दीक्षित, त्याचप्रमाणे शारदाभूषण प्रसिद्ध त्रिगुणित पदवीधर नानासाहेब वैद्य आदिकरून बडी बडी मंडळी नानासाहेबांमुळेंच शिरडीस बाबांच्याकडे येऊं लागली. त्यानंतर इतरही पुष्कळ ठिकाणचे विद्वान् पंडित पदवीधर येऊं लागले, व त्यामुळे बाबांची उज्वलकीर्ति जिकडे तिकडे पसरली. त्यानंतर कविरत्नश्रीदासगणुमहाराज यांनींही बाबांची कीर्ति देशोदेशीं पसरविण्यांत पुष्कळ भर घातली. नानासाहेबांनीं बाबाच्याकरितां पुष्कळ पैसे खर्च केले, असो. नानासाहेब म्हणाले, बाबा आपल्याला परमार्थाचे धडे देत असत. बाबांची, धडे देण्याची व

ते पाठ झाले आहेत किंवा नाहीं हे पाहाण्याची त्याची शैली कांहीं अप्रतिम असे. बाबा म्हणाले, नाना सर्व षड्विकारात जिंकण्यांत अतिशय सोपा असा विकार कोणता रे ? नानासाहेब म्हणाले, मला माहीत नाहीं. बाबा म्हणाले, अरे मत्सर. हा विकार जिंकण्यास फार सोपा. त्या विकारांत आपलें नफानुकसान कांहींच नाहीं. मत्सर म्हणजे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणे. नाना, दुसऱ्यास ऐश्वर्य प्राप्त झाले म्हणजे आपल्यास सहन होत नाहीं. आपण त्याची निंदा करतो. त्याचे नुकसान होण्यांत आपल्यास आनंद वाटतो. पण हें—कां बरें —असे त्याचा उत्कर्ष झाल्यास आपले नुकसान काय होते ? पण मनुष्य याचा कधींच विचार करीत नाहीं. त्याला ऐश्वर्य प्राप्त झालें, तर आपण आनंद मानावा व आपणही तसें ऐश्वर्य प्राप्त करून घेऊं अगर प्राप्त करून घेण्याचा खटपट करूं, अशी इच्छा बाळगावी व हिंमत धरावी. त्याने आपलें काय घेतलें आहे ? कांहीं नाहीं. त्यांत त्याच्या कर्मानुसार ऐश्वर्य प्राप्त झालें, म्हणून आपणांस वाईट कशास वाटावयास पाहिजे ? म्हणून प्रथम मत्सर जिंकावा. नानासाहेबांनीं बाबाचे चरणयुगल वंदन केले व म्हणाले कीं, बाबा आजपासून मी मत्सर जिंकण्याचा प्रयत्न करीन.

कांहीं महिने लोटल्यावर नानासाहेब असेच एक वेळां बाबांच्याजवळ बसले असतां, बाबा म्हणाले, नाना, आज तुला मी एक दुसरा धडा देणार आहें. नानासाहेब म्हणाले, फार उत्तम. बाबा म्हणाले नाना, जर आपल्याजवळ कोणी कांहीं मागूं लागला व त्याचें मागणें आपल्या आहारांत असलें किंवा हस्ते परहस्ते त्याच्या मागण्याची पूर्तता आपल्यास करून देतां येण्यासारखी असल्यास त्यांस कधींही नाहीं म्हणूं नये. आपल्याजवळ जर कांहीं नसेल, तर त्यांस गोड शब्दांत नाहीं म्हणून सांगावें. त्याची थट्टा अगर उपहास करूं नये. व त्यावर रागावूं नये. कदाचित् आपल्याजवळ असून आपला त्यास देण्याची इच्छा नसल्यास, मजजवळ कांहीं नाहीं असें खोटें बोलूं नये. मजजवळ आहे, पण देण्याची सवड नाहीं किंवा माझी इच्छा नाहीं असें त्यांस सौम्य शब्दांत सांगावें. याप्रमाणे बोलून बाबा म्हणाले,

नाना, हा धडा ध्यानात राहील का विसरशील ? नानासाहेब म्हणाले, यात काय आहे ? मी हा तेव्हाच ध्यानात ठेवीन. बाबा म्हणाले, नाना, धडा जितका सोपा दिसतो, तितका सोपा नाहीं. दिसण्यांत सोपा दिसला, तरी त्याप्रमाणे वर्तन करण्यास फार कठीण आहे; नानासाहेब म्हणाले, बाबा, धडा कठीण असला, तरी मी तो मनापासून लक्षांत ठेवीन. बाबा म्हणाले, बरे आहे.

या पूर्वीच मजा काय झाली होती कीं कोपरगांवीं शिरडीच्या रस्त्याच्या सडकेस लागूनच श्रीगोदातटीं एक लहानसे दत्तमंदीर आहे. तेथें एक बोवा राहात असत. ते बोवा आचरणाने चागले असत. नानासाहेब शिरडीस जाऊं लागले, म्हणजे श्रीदत्तदर्शन घेण्याकरितां जात असत. इतकेंच नव्हे, तर ते त्या मंदिरांतील दत्तदर्शन केव्हाही टाळीत नसत. दत्तदर्शनामुळे तेथील बोवांचा व त्यांचा बराच परिचय झाला. होतां होतां बोवांनीं एक दिवस नानासाहेबाजवळ हळूच गोष्ट काढली कीं, माझ्या मनांत देवळासमोर श्रीगोदावरीस घाट बांधावा, म्हणजे मंदिरास शोभा येऊन घाटावर सायंकाळचे वेळीं मोकळ्या हवेंत लोकांना बसण्यासही मजा वाटेल; कपडे वगैरे धुण्याची व पर्जन्यकाळीं प्रातःस्नानाची चांगली सोय होईल. तेव्हा एवढें कार्य करण्याचे आपण श्रेय घ्यावें. नानासाहेब म्हणाले, बोवा, हें काम फार खर्चाचे आहे. घांट बांधण्याचें काम थोडक्यांत केव्हांच होणार नाहीं. बोवास माहित होतें कीं, नानासाहेब भाविक व श्रीमंत आहेत. कलेक्टरसाहेबांचे चिटणीस आहेत, व त्यांना पगारही पुष्कळ मिळतो. तेव्हां त्यांनीं ते मनात आणिल्यास स्वतः किंवा इतरांची मदत घेऊन करूं शकतील. म्हणून त्यांनीं नानासाहेबांजवळ हळू हळू व युक्तीयुक्तीने गोष्ट काढली परंतु नानासाहेबांनीं ती कबूल केली नाहीं. नानासाहेब दर्शनास गेले, कीं, बोवा त्यांच्याजवळ प्रत्येकवेळीं ही गोष्ट काढीत. पुष्कळ वेळ तीच तीच गोष्ट मनुष्य सांगूं लागला, म्हणजे ऐकणारा प्रस्तरांतःकरणाचा जरी असला तरी त्याच्या मनावर त्याच्या सांगण्याचा कांहींना कांहीं तरी परिणाम हा होतोच. तशांत नानासाहेब तर भाविक व श्रद्धाळू. शिवाय हें मंदीर बाबांच्या

शिरडीच्या वाटेवर श्रीगोदातटीं आहाराच्या बाहेरचें काम, तरी त्यांना मी हें करीतच नाहीं असे एकाएकीं बोवांना निक्षून सांगण्याचे जीवावर आलें, व ते बोवांना म्हणाले कीं, बोवा, तुम्हीं म्हणतां तशा तऱ्हेचे घांट बांधण्यास हजारों रुपये खर्च लागेल, व तशी तजवीज मजकडून होणें शक्य नाहीं. परंतु तुम्हीं म्हणताच तर मंदिरापुरते दहा बारा पायऱ्यांचा मंदिराइतक्याच रुंदीचा घांट बांधण्यास माझ्या अजमासाप्रमाणे तीनेकशें रुपये खर्च येईल व तितकें काम फार तर मी करूं शकेन. "कोल्हा काकडीसच राजी'. बोवा म्हणाले, आपण तूर्त तितकें केले तरी पुष्कळ होईल. नानासाहेब म्हणाले, बरें तर. तुमची तशीच इच्छा असल्यास मी तितक्या पैशांची तजवीज करीन. याप्रमाणें उभयतांचे बोलणें होऊन नानासाहेब परत नगरास गेले.

नंतर काहीं दिवसानीं नानासाहेबांस बाबांचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे त्यांनीं एक दिवस नक्की करून आपल्या एका स्नेह्यास बरोबर घेऊन ते शिरडीस जाण्याकरितां रात्रीच्या गाडीने निघाले, व कोपरगांवांस जरा थोडीशी रात्र असतांच आले. कोपरगांवीं येतांच त्यांच्या मनांत आलें कीं, आतां आपण जर दत्तदर्शनाकरिता दत्तमंदिरांत शिरलों, तर बोवा आपल्याजवळ तीनशे रुपये मागेल व त्याने त्या रकमेची मागणी केली म्हणजे आपल्यास नाहीं म्हणता येणार नाहीं. आपण इतके पैसे बरोबरही आणले नाहींत, व इतक्या रकमेची आजपर्यंत सोयही केली नाहीं. तरी कसे करावें ? इतक्यांत त्यांना एक युक्ति सुचली कीं, या खेपेस मंदिरावरून न जाता दुसऱ्या मार्गानेच परभारें शिरडीस जावें. त्यांनीं ही सर्व गोष्ट आपल्या स्नेह्यास सांगितली, व त्यांचाही सल्ला विचारला. त्यांनाही नानासाहेबांचें म्हणणें पटलें. त्यांनीही नानासाहेबांस त्यांना सुचलेल्या युक्तीप्रमाणेच करण्याचा सल्ला दिला. नानासाहेबांस बाबांनीं काय धडा दिला होता, व प्रत्येक प्राणिमात्राच्या मनांतील लपंडाव व डावपेंच, तो शिरडीनिवासस्थ अंतर्साक्षी प्रभू बरोबर जाणतो;— हे नानासाहेबांच्या स्नेह्यांस काय माहित ? नानासाहेबांना ही बाबांनीं दिलेल्या धड्याची त्यावेळीं विस्मृती झाली. म्हणून त्यांनीं नेहमीच्या रिवाजास फाटा देऊन, दत्तदर्शन टाळून परभारें

जाण्याचा विचार केला. कोपरगांवास जिकडे जावें तिकडे बाभळी व निवडुंग. नानासाहेब व त्यांचे स्नेही प्रथम शौचास निघाले; तेव्हां जरा अंधारच होता. व रस्ताही नेहमीचा नसल्यामुळे त्याची व त्याच्या स्नेह्यांची फारच तारांबळ उडाली, व त्यांच्या पायांत व शरीराच्या इतर भागातही बाभळीचे व निवडुंगाचे काटे बोंचले. ते कसेबसे आडमार्गांतून नेहमीच्या सडकेस येऊन मिळाले. एकंदरींत त्यांचे आडमार्गावलंबनामुळे पुष्कळसे हाल झाले. पण करणार काय ? जाणूनबुजूनच तो मार्ग पत्करला. त्यांचे स्नेही शौचास बसतात तोंच त्यांच्या गुह्यस्थानीं एका बाभळीच्या झाडाची खुंटी शिरली. त्यामुळें ते फारच विव्हळ झाले. असो. पुढें चागले फटफटीत झाले; व दोघांनींही आपल्या शरीरातील व पायातील काटे हळू हळू काढून राजरस्त्याने चालूं लागले, व शिरडीस पोहोंचले. नानासाहेबांस बाबाच्या दर्शनाची अत्युत्कंठा. ते लागलेच मशीदींत गेले व त्यांनीं बाबांच्या चरणाचे वंदन केले, व बाबांच्याजवळ बसले. बाबा नानासाहेबांशीं कांहींच बोलले नाहींत. सद्गुरुवचनांमृताची नानासाहेब नेहमींप्रमाणें वाट पाहूं लागले. नेहमींची पद्धत अशी असे कीं, नानासाहेब आले कीं, बाबा त्यांना “ नाना केव्हा आलास ? कसे काय ? ” वगैरे कुशल प्रश्न विचारावयाचे. या खेपेस नानासाहेब बराच वेळ बाबांच्याजवळ बसले, तरी बाबा एक शब्दही त्यांच्याशीं बोलले नाहींत. आपली चूक कोठें झाली किंवा आपण बाबांचा धडा लक्षांत ठेवण्यास विसरलों हे नानासाहेबांच्या ध्यानांत आलें नाहीं. बाबांचें मन दुसरीकडे कोठें तरी गेले असेल व त्यामुळे ते आपल्याशी नेहमींप्रमाणे बोलले नसतील. आतां बोलले नाहींत, तर मग बोलतील, असें नानासाहेबांस वाटलें. थोडावेळ वाट पाहून ते वाड्यांत निघून गेले. बाबा कां बोलले नाहींत याबद्दल त्यांनींही बाबांस विचारले नाहीं. नानासाहेब वाड्यांत गेले खरे, पण बाबा आपणाजवळ बिलकूल बोलले नाहींत याबद्दल हुरहुर लागली. त्यांचें चित्त व्यग्र झाले त्यांस कांहीं सुचेना. त्यांस खिन्न वाटूं लागलें. शिरडीस येऊन गुरुमाय बोलत नाहीं, मग शिरडीस यावयाचें तरी कशाला ? असेंही त्यास वाटूं लागले. पुन्हां ते मशीदींत गेले पुन्हां बाबांचे चरण वंदन केले, व आतां तरी बाबा दोन शब्द बोलतील अशा अपेक्षेनें पुन्हां

त्यांच्याजवळ बसले बाबा कांहींच बोलले नाहींत. मग मात्र नानासाहेबांची निराशा झाली. व त्यांनीं बाबांस त्यांच्यांशीं न बोलण्याचें कारण विचारिलें. बाबा म्हणाले, नाना, जो आपला धडा पाठ करीन म्हणतो व करीत नाहीं, त्याच्याजवळ आपण कशाला बोलावें. नानासाहेब म्हणाले, बाबा, आपण दिलेले धडे तर मी बरोबर ध्यानात ठेविलो. बाबा म्हणाले, अरे गृहस्था, बोवा तीनशे रुपये मागेल म्हणून सरकारचे दर्शन टाळावयाचे व आडमार्गानें जावयाचे, ही धडा पाठ करण्याची कोठली पद्धत ! अरे, तूं पैसे आणले नव्हतेस किंवा पैशाची सोय तुजकडून झाली नव्हती तर बोवा तुला काय खाता ? त्यास सांगावयाचें कीं पैशाची अद्याप सोय झालेली नाहीं. परंतु बोवा पैसे मागेल म्हणून सरकारदर्शन टाकून, मुद्दाम आडमार्गानें जावयाचे ही कोठची युक्ति ! बरे तर मग, पायांत व अंगात काटे शिरले कीं नाहीं ! व तुझ्याबरोबर असलेले ते शहाणे त्यांच्या * * * खुंटी शिरली कीं नाहीं ! मग अशा मनुष्याशीं आपण कशाला बोलावे ? याप्रमाणे बाबाचे बोल ऐकल्याबरोबर बाबांच्या सर्वसाक्षित्वाबद्दल नानासाहेबांस अत्यंत कौतूक वाटून, त्यांना त्यांची चूकही कळून आली. आतां मी पुन्हां अशी चूक करणार नाहीं, असे बोलून नानासाहेबांनीं पुन्हा त्या जगज्जनकाचें चरण वन्दन केले, व गुरुमाऊलीच्या भक्तवत्सलतेबद्दल व पारमार्थिक धडे देऊन त्यांची परीक्षा पहाण्याच्या अद्वितीय कुशलतेबद्दल धन्यता मानिली.

नंतर बरेच दिवस लोटल्यावर एके दिवशीं नानासाहेब बाबांच्या दर्शनास गेले असता बाबा म्हणाले, नाना तुला आज एक दुसरा धडा देतो. नानासाहेब म्हणाले फार उत्तम—बाबा म्हणाले नाना आपल्याकडे कोणी कांहीं मागावयास आला तर आपल्या शक्तिप्रमाणे व इच्छेप्रमाणें त्यास द्यावें व तो तेवढयाने तृप्त होत नसेल व जास्त मागत असेल तर त्याला गोड शब्दांनीं नाहीं म्हणून सांगावे. त्याच्यावर रागाऊं नये,अथवा त्यास आपल्या संपत्तीचा अथवा अधिकाराचा जोर दाखवूं नये. नानासाहेब म्हणाले बरें मी आपण सांगितल्याप्रमाणें वागेन. याप्रमाणें बोलून बाबास वंदन करून नानासाहेब परत गेले. धडा दिला कीं, त्याप्रमाणे वर्तन होते कां होत नाहीं. याची परिक्षा पाहाण्याची

बाबांची पद्धत असे, म्हणून वर सांगितलेच आहे याचा अनुभव खुद्द मलाही आहे, व त्याबद्दल मी पुढे एखादे वेळेस लिहीन. वरील धडयास बरेच महिने जाऊं दिले, व एके दिवशीं असा चमत्कार केला कीं, त्यावेळीं नानासाहेब कल्याणास होते, व घरात आईसाहेबांनीं ( नानासाहेबांच्या कुटुंबानीं ) एक डेराभर भाजणी नुकतीच तयार करून ठेविली होती. एक भिकारीण भीक मागण्याकरिता नानासाहेबांच्या वाडयात आली, व भीक मागूं लागली. घरातील मंडळी नेहमीप्रमाणे नेहमीची भिक्षा घालूं लागली. भिक्षेकरीण म्हणे, मला ती भिक्षा नको. मला भाजणी पाहिजे. आईसाहेब म्हणाल्या तिला भाजणीच पाहिजे असेल तर घाला थोडीशी. त्याच्या आज्ञेप्रमाणे मंडळी भाजणी घेऊन गेली व घालूं लागली. ती म्हणे, मला पुष्कळ भाजणी पाहिजे. आईसाहेबांनीं आणखी थोडीशी जास्त भाजणी आणली. तरी ती म्हणे छे, मला पुष्कळ भाजणी पाहिजे. आईसाहेब म्हणाल्या, अग पुष्कळ पुष्कळ म्हणजे किती ? माझ्या घरात मुलेबाळें आहेत. भाजणी त्यांना लागते. ती अगदीं संपली होती. म्हणून परवांच मी नवी केली. ती तुला पुष्कळ ती किती घालूं ? ती म्हणे पुष्कळ घाला. बरें, फारच कटकट करतेस अर्धी घालते. असे सरतेशेवटी कंटाळून आईसाहेब म्हणाल्या. ती म्हणाली सगळीच घाला. आईसाहेब म्हणाल्या मग तर तूं फार शहाणी ; वाटले तर अर्धी देतें नाहीं तर जा. ती आपला पहिलाच हट्ट धरून बसली व घराबाहेर जाईना. आईसाहेबांनीं पराकाष्ठा करून पाहिली, व ही भिकारीण आपला हेतु काहीं सोडीत नाहीं, व घराबाहेरही जात नाहीं, असें पाहून त्यांनीं ती गोष्ट दिवाणखान्यांत नानासाहेब बसले होते, त्यांना जाऊन सांगितली. व आपण अर्धी भाजणी देण्यास कबूल झाले असतानासुद्धां ती भिकारीण सर्वच भाजणी मागते व दिली नाही तर घरांतून हलतही नाहीं, तरी आपण जरा खाली यावें अशी त्यांना विनंती केली. हें ऐकतांच नानासाहेबांस राग तर आलाच ते खालीं आले, व कोण आहे रे शिपाई तेथें, या भिकारणीला हांकलून लावा असे रागानें म्हणाले. भिकारीण तर भिकारीण आणि म्हणे सगळी भाजणी द्या. सगळी भाजणी मागावयाला लाज तरी वाटते का ? द्यायची असेल तर देतात तितकी घे नाहीं तर शिपायाकडून हांकून देतो

तुला. भिकारीण म्हणाली महाराज, नसेल द्यावयाची तर नका देऊं सगळी पण शिपायाकडून गचांडी देऊन कशाला घालवितां, मी आपली जातें असें म्हणून ती भिकारीण निघून गेली.

पुढे काही दिवसानीं नानासाहेब बाबांच्या दर्शनाकरितां शिरडीस गेले. मशिदींत जाऊन बाबांचे चरण वंदन केले, व नेहमींप्रमाणें बाबांच्याजवळ बसले. केव्हा आलास, कोण कोण मंडळी बरोबर आली आहेत वगैरे कुशल प्रश्न नेहमींप्रमाणे बाबानीं नानासाहेबास मुळींच विचारिले नाहींत. बाबा आतां बोलतील मग बोलतील अशी वाट पाहात नानासाहेब बराच वेळ बसले; परंतु बाबा त्याच्याशीं मुळींच काहीं बोलेनात. बाबांचे मौन नानासाहेबांस असह्य होऊं लागले. ते मनात विचार करूं लागले कीं, बाबा आज नेहेमींप्रमाणें आपल्याशीं बोलत नाहींत कां ? काय बरें झालें ? काय चुकलें ? कां बाबानाच आज बरें नाहीं ? याप्रमाणें हजारों तरंग त्यांच्या मनांत घोळूं लागले. परंतु बाबांच्या मौनाचा त्यांना उमज पडेना, व तशा त्या मुग्धस्थितींत आणखी अधीक वेळ राहवेनाही शेवटीं नानासाहेब म्हणाले, बाबा आज आपण मी एथे आल्यापासून एक शब्दही बोलत नाहीं हें काय ? बाबा म्हणाले, जो आपला धडा गिरवात नाहीं. त्याच्याशी काय बोलावयाचे ? नानासाहेब म्हणाले, बाबा कोणता धडा मी गिरविला नाहीं ? आपण सागतां ते धडे मी बरोबर गिरवितो. मला तर कांहीं आठवत नाहीं कीं, आपण सांगितलेला धडा गिरविण्यास मी विसरलो, बाबा म्हणाले, मग त्या दिवशीं ती भिकारीण भाजणी मागण्याकरितां आली होती व ती हट्ट धरून बसली होती व ज्यास्त नव्हती तर अधिकाराच्या घमेंडींत तिला शिपायाकडून हांकून कशाला लावीत होतास ? ती कीतीक वेळ तुझ्या दारांत बसली असती, व तूं तिच्या मागणीप्रमाणें तिला भाजणी दिली नसतीस, तर ती काय करती. कांहीं वेळ वाट पाहून निघून जाती. मग गोड शब्दानीं सांगण्याएवजीं तिच्यावर रागावून तिला शिपायाकडून घालून देण्यापर्यंत कां मजल आली. बाबा काय म्हणतात व हें केव्हां झालें याची प्रथम नानासाहेबांस स्मृतीच होईना. कारण या गोष्टीस जवळ जवळ पांच सहा महिने तरी झाले होते, व बाबा अशा प्रकारच्या भिकारणीच सोंग घेऊन आपली परीक्षा

घेतील ही कल्पनाही त्यांच्या मनांत नव्हती. पुढे कांहीं वेळाने त्यांना या गोष्टीचे चांगलें स्मरण आले, व आपल्या हातून ही चूक झाली खरी असें जेव्हा त्यांच्या लक्षांत आले, तेव्हा ब्रह्मांडरंगभूमीवर पडद्याआड बसून मानव बुद्धिनत्ते पलिकडील अनंत लीलारूपी निरनिराळे देखावे दाखविण्यात कुशल अशा नाट्याचार्य बाबांच्या पारमार्थिक धड्यांचे व त्या धड्याची परीक्षा पाहण्याचें त्यांना अत्यंत सानंदाश्चर्य वाटले.

—स्फुट— स्रग्धरा—

पुण्यश्लोका, अनंता मजवरी रुससी कां असा ज्ञानवंता ।
एकांता सेवुनिया, कितितरी धरिसी मूकभावा महंता ।
श्रीकांता, एकवेळा तरी वद मशि, दे, दर्शना भाग्यवंता ।
चिंताऽहंता[1]-विहंता[2], विनवि परिस ही साइश्री एकदंता ॥

पृथ्वी.

महा मलिन मोह हा झुकवि अंगने[3] मां[4] कडे ।
तव श्रवण कीर्तनांतुनिहि कीं सिनेमां कडे[5]।
मनासि जरि ने गुरो जपतपादि नेमा, कडे ।
कृपेविण न आवरे, इतर साधनें मोकडें ॥ १ ॥
न रामपदिं जाऊं दे त्वरित खेचि धामां[6] कडे ।
सुदामसख आवडी वरुनि ओढि दामां[7] कडे ।
जरी फिरुनि धांव घे चपल चित्त नामां[8] कडे ।
न नाम मुखि येऊं दे पळवि त्यांस[9] कामां[10] कडे ॥ २ ॥
जरी पतित जात मी, शरण शेषशायी[11] कडे ।
ह्मणे मज सुरेश, जा सुपथदर्शि साईकडे ।
ह्मणें तुज न बाळ त्या अमरवृक्ष[12] साईकडे ।
तवेप्सित तुला मिळे, न मजपाशि साईकडे ॥ ३ ॥

१–अभिमान, २ नाश करणारा ३ स्त्री. ४ लक्ष्मी,-संपत्ति. ५ खेळ. ६ पर–प्रपंच ७ पैसा, ८ नामस्मरण. ९ मनास. १० वासना. ११ शेषशाई. १२ सुरतरू.

कुठें वसत साइ जें पुसत मार[1] बाबाकडे ।
सुगौसपतटीं म्हणे, शिरडिसाइ बाबाकडे ।
नको फिरुं उगा गिरीदरि कपाट[3] योबा, कडे ।
जगींसम तया क्वचित् असति अन्य बा,बाकडे[4] ॥ ४ ॥
न हो अदय साइ तूं फिरवि दृष्टि बाळाकडे ।
बहू कळवळे, रडे, उचलि घेई बाला,कडे[5] ॥
नको सरि न मुद्रिका[6] नच तसेंचि वाला. कडे[7] ॥
कृपा कवच पाहिजे इतर लेणिं, बा, लाकडे[8] ॥ ५ ॥
शरण्य गुरुराज तूं सुजन चक्रवर्ती हिरा ।
तव स्तवनिं लाजते चतुर शारदेची[9] गिरा ।
अगा गिरिधरा म्हणे तुजचि नागरा श्रीमिरा ।
अमोलिक सजीव चित्परिस[10] अष्टपैलू चिरा ॥ ६ ॥
अगा हृदयचिन्मणी[11], मुनि जनैक चूडामणी ।
तपोधन शिरोमणी, स्वजन भक्त कंठमणी[12] ।
पळे दुरितें[13] तत्क्षणीं बघसि जैं कृपा-ईक्षणीं[14] ।
उरेल न कशी धणी[15] असुनि आमुचा तू धणी[16] ॥ ७ ॥
हिमाद्रिनग-सन्मणी[17] नच समर्थ त्वन्मापणीं[18] ।
सहस्र रसना फणी[19] श्रमत निर्गुणा वानणीं[20] ।
थके सगुण[21] लेखनीं चतुर सात्यकी[22] लेखणीं ।
चिदंबर प्रभंगमणी[23]; सुगति-सौख्य-चिंतामणी[24] ॥ ८ ॥

---

१ मारमदन. बाबा=पिता, =शेषशाई २ अरे बाबा,. ३ पर्वताचे कडे. ४ श्रेष्ठ. ५ कडेवर. ६ अंगठी. ७ हातांत घालण्याचें कडें ८ लाकडाप्रमाणें शुष्क. ९ श्री संतराज्ञी मिरामाई. १० ज्ञान परिसाचा मूर्तीमंत अष्टपैलू चिरा. ११ अंतःकरणांत वास करणारा ज्ञानसूर्य. १२ गळ्यांतील ताईत. १३ पातक, दोष. १४ कटाक्षानें. १५ इच्छा. १६ मालक. १७ पर्वतश्रेष्ठ हिमालय. १८ तुझें माप घेण्यास=तो शकू किंवा सांखळी होऊन. १९ हजार जिभेचा शेष. २० वर्णन करण्यास. २१ सगुण परमात्म्याचे गुण लिहीण्यांत. २२ ब्रम्हदेव. २३ ज्ञानगभीचा सूर्य. २४ मोक्ष-सुखदेणारा गजानन.

पवित्र गुरुमाय तूं सुखनिवास--दाक्षायणीं ।
स्वभक्तजन--संसृती--मल--विनाशिका यक्षिणी ।
त्वदीय पिलुं बाल हा सदय पंखि घे पक्षिणी ।
समर्थ कृपया विना न अन्य तद्रक्षणीं ॥ ९ ॥
अगा जननि साइ मा शुचित मे प्रिये मंगळ ।
परागति दिली तुवां नंत-अमंगळे- पिंगले ।
नको गति, सदा रती चरणिं मागणे नागळे ।
कृपा करि मर्मांविके पुरवि बालकाचे लळे ॥ १० ॥
प्रपंच सुदुरास ही पतित, दांड, दुष्टा, खरी ।
गुरो हणित नाशिका[12] अनुसरे[13] गमे साखरी[14] ।
खरा खर निलाजरा, श्रमत वानिता वैखरी
कृपा-सुरभि--शंकरी, म्हणुनि जात दूरी खरी ॥ ११ ॥
अलौकिक सुलक्षणी अतुल श्रेय त्वद्वीक्षणीं ।
कृपा करिशि त्याक्षणीं नर रमे परब्रह्मणीं ।
उशीर मग साइ कां करि कृपा न दोषागणी ।
सचिंत जरि मी, कसें तुम्ही दयार्द्र चिंतामणी ॥ १२ ॥

संस्कृत व प्राकृत मिळून एकदर २६ कविता व श्री उदीमाईचे व बाबांचे पारमार्थिक धडे व त्यांचीं परीक्षा या संबंधाचे ६ अनुभव मिळून एकंदर सबंध ३२ पाकळ्यांचे भिन्नभिन्न वर्णांचे वाक्कमल ज्या जगन्नायकाच्या कृपेने तयार करण्याची स्फूर्ती झाली. त्याच जगज्जीवन बाबांच्या चरणावर तें अत्युत्कट प्रेमानें व नितांत श्रद्धेने अर्पण करून आपली रजा घेतों. **बाबांचें बाळ**

---

१ अंबिका-पार्वती. २ आपल्या भक्तांचें संसार-पातकाचा नाश करणारी. ३ जादुगारीण. ४ त्यांचें रक्षण करण्यांत. ५ मोक्ष. ६ शरण आलेली ७ वेश्या. ८ पिंगला वेश्या जिची कथा एकनाथी-भागवतांत दिलेली आहे. ९ प्रेम. १० प्रपंचातील अतिदुष्ट आशा ११ गाढवी. १२ नाक फोडतें तरी. १३ मी तिच्याच मागें लागतो. १४ इतकेंच नव्हे पण ती मला साखरेप्रमाणें गोड वाटते. १५ गाढव. १६ कल्याण करणारी जी कृपारूपी कामधेनू. १७ सत्य, खरोखर, खरी.

# गुरुप्रेम निरूपण

प्रेमाची जाती कसी असते, मोक्ष गुरुचें महत्व कस असतें व इतर गुरु साधनरूपाने कसे उपयोगी येतात, याबद्दल यदू अवधूत कथेतील एक बोधपर प्रसंग.

ए. भा. अ. ९ वा. श्लो ३०।३१ ओ. ३८९ ते ४६९

म्हणसी एका गुरूचे ठायीं । तुज सर्वथा विश्वास नाहीं ।
येअर्थी सावध होईं । विशद पाहीं सांगेन ॥ ३८९ ॥

गुरूने सांगताचि कानीं । ज्याची वृत्ति जाय विरोनि ।
जेवीं मिळतां लवणपाणी । अभिन्नपणीं समरसे ॥ ३९० ॥

त्यासी साधक बाधकताबाध । हें बोलणें अति अबद्ध ।
जेवीं निमालियासी वोखद । न पाजवे दुग्ध गर्भस्था ॥ ३९१ ॥

यापरी ज्याची कर्तव्यता । नाहीं नाहीं गा सर्वथा ।
त्या ऐशी हे अवस्था । कदा कल्पांता न लभेची ॥ ३९२ ॥

गुरूने सांगितलें कानीं । स्वरूपावबोध जाला मनीं ।
परी ते न राहेचि निश्चळपणीं । बाह्यदर्शनीं विक्षेपू ॥ ३९३ ॥

आसनीं बैसल्या स्वरूप स्थितीं । आसन सोडिल्या प्रपंचस्फूर्ती ।
ऐशी एकदेशी स्थिति । नातळती निजयोगी ॥ ३९४ ॥

देह आसनीं निश्चळ । अथवा कर्मी हो चंचळ ।
परी वृत्ति सर्वदा निश्चळ । तेचि निर्मळ निजयोगी ॥ ३९५ ॥

परशुरामेसीं रणांगणीं । भीष्म भिडला निर्वाणवाणीं ।
तोडरीं घातिला जिणोनी । वृत्ति समाधानी अचंचळ ॥ ३९६ ॥

करितां निर्वाण युद्ध । ज्याची न मोडे समाधी ।
हेंचि साधावया त्रिशुद्धी । चोवीस गुरु विधीं वंदीलेम्यां ॥ ३९७ ॥

देह निश्चळत्वें वृत्ति निश्चळ । देह चंचळत्वें चित्ति चंचळ ।
तरी ते देह वुद्धीची सबळ । नव्हे केवळ निज बोधू ॥ ३९८ ॥

होतां प्रपंच दर्शन । वृत्तीसी विक्षेप होय जाण ।
तो विक्षेप करावया छेदन । बहु गुरुसाधन म्यां केलें ॥ ३९९ ॥

निजगुरूंनीं सांगितल्या अर्था । त्या साधावया परमार्था ।
नाना प्रपंच पदार्थां । गुरुसंस्था म्यां केली ॥ ४०० ॥

जधोनियां विक्षेपता । तेचि लाविली गुरुत्वपथा ।
ऐसे नि साधनें साधितां । जग स्वभावतां परब्रह्म ॥ ४०१ ॥

पूर्वीं गुरूंनीं बोधिलें नाहीं । तरी पृथ्व्यादिके बोधितील कायी ।
तोचि निजार्थ साधावया पाहीं । गुरु उपायीं प्रवर्तलों ॥ ४०२ ॥

गुरूने सांगितलें निजज्ञान । हृदयीं प्रकाशलें चिद्भान ।
ते विद्युत्प्राय चंचळ जाण । स्थैर्यपण त्या नाहीं ॥ ४०३ ॥

जें मुळींचि चंचळ । तें कदा नव्हे पुष्कळ ।
क्षणाभासे क्षणा चपळ । तेणें तळमळ साधकां ॥ ४०४ ॥

जैसें मुखींचें आंविस जाये । तेणें सर्प डंखला राहे ।
तैसी वेदना साधकां होये । वियोगु न साहे सर्वथा ॥ ४०५ ॥

येरवीं ब्रह्म अद्वितीय नित्य । हें सकल ऋषींचें संमत ।
त्यांसीही पुसों जातां बहुत । विक्षेप तेथ उठती ॥ ४०६ ॥

एक म्हणती ब्रह्म सगुण । एक म्हणती तें निर्गुण ।
ऐसे वाद करिती दारुण । युक्ति खंडण अभिमानें ॥ ४०७ ॥

एक म्हणती ब्रह्म सप्रपंच । एक म्हणती निष्प्रपंच ।
मिळोनियां पांच पांच । शब्द कचकच वाढविती ॥ ४०८ ॥

प्रपंचदर्शनें विक्षेपता तेथ साधावया निज ऐक्यता ।
सुबुद्धीने नाना पदार्थां । गुण ग्राहकता गुरुरूपें ॥ ४०९ ॥

तेथ साधकांचे प्रश्न । सहसा न पावती समाधान ।
यालागीं पुसावया मन । न रिघे जाण ते ठायीं ॥ ४१० ॥
जेथूनि विक्षेपता वाढे । तेथेंचि ऐक्यता जोडे ।
तें नाना गुरुत्वे रोकडें । साधन चोखडें योजिलें ॥ ४११ ॥
जीं जीं सांगितलीं गुरु लक्षणें । तीं तीं निजबुद्धीचीं साधनें ।
समूळ विक्षेपू तेणें । तीव्र धारणे छेदिला ॥ ४१२ ॥
तेणे चंचळत्वे निश्चळ । फावलें निजबोधाचे मूळ ।
दृश्य देखतां केवळ । भासे सकळ चिन्मात्र ॥ ४१३ ॥
जें माझ्या निजगुरूनीं । पूर्वीं दिधलें होतें बोधुनी ।
तेंचि नाना गुरुत्वें साधूनी । विक्षेप छेदुनी पावलों॥४१४ ॥
निजगुरु तो एकचि जाण । इतर गुरु साधकत्वें साधन ।
हें यथा तथ्य लक्षण । तुज निरुपण म्यां केलें ॥ ४१५ ॥
येथ प्रपंचाचें भानाभान । कर्मकरितां नकळे जाण ।
लाधली निजबोधाची खूण । समदर्शन सर्वदा ॥ ४१६ ॥
दृश्य देखतां दृष्टी । नव्हे दृश्येसीं भेटी ।
हारपली कर्मत्रिपुटी । बोध कसवटी अभिनव ॥ ४१७ ॥
यथेष्ट करितां भोजन । उष्टेना निराहार लक्षण ।
जगेंसीं वागतां जाण । एकलेपण मोडेना ॥ ४१८ ॥
तरंग सागरामाजी क्रीडतां । न मोडे उदकाची एकात्मता ।
तेवीं जगामाजी वर्ततां । दुजी वार्ता मज नाहीं ॥ ४१९ ॥
नवल सद्गुरूची नवायी । सर्वीं सर्व तोचि पाहीं ।
गुरु वेगळें रितें कांहीं । उरलें नाहीं सर्वथा ॥ ४२० ॥
आतां माझें जें मीपण । तें सद्गुरु जाला आपण ।
बोल तें तुझें जें तूंपण तेंही जाण सद्गुरूची ॥ ४२१ ॥

याहीपरी पाहातां । माझा गुरु एक एकुलता ।
तेथें दुजेपणाची वार्ता । नाहीं सर्वथा यदुराया ॥ ४२२ ॥
ऐशी सद्गुरुकथा । तुज सांगितली परमार्था ।
हरिखें आलिंगिलें नृपनाथा । दोघां ऐक्यता निजबोधें ॥ ४२३ ॥
जीवीं जीवा पडली मिठी । आनंदें वोसंडिली सृष्टी ।
तेणे वाचेसी पडली वेल वटी । बोलों उफराटी विसरली ॥ ४२४ ॥
हरिखुन संटवे हृदय भुवनीं । बाहेर वोसंडे स्वेदें जोनी ।
आनंदघन वोळला नयनीं । स्वानंद जीवनीं वर्षतु ॥ ४२५ ॥
तुटली अहंकाराची बेडी । पावलों भवार्णव परथडी ।
म्हणौनि रोमांची उभिली गुढी । जिंतीली गाढी अविद्या ॥ ४२६ ॥
समूळ देहभावो पळाला । यालागीं गात्र कंपू चळचळा ।
संकल्प विकल्प निमाला । मनेंसीं बुडाला मनोरथू ॥ ४२७ ॥
जीवभावो उखिता । यदुनें अर्पिला गुरुनाथा ।
तें चिन्ह बाहेरी तत्वता । दावी सर्वथा निजांगीं ॥ ४२८ ॥
तो अवधूत जाण दत्तात्रया । तणें आलिंगुनी यदुराया ।
निजरूपाचा बोधू तया । अनुभवावया दीधला ॥ ४२९ ॥
दत्तात्रेय शिष्य परंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।
तेणें जनार्दनू तिसरा । शिष्य केला खरा कलियुगीं ॥ ४३० ॥
गुरु प्राप्तीलागीं सर्वथा । थोर जनार्दनासी चिंता ।
विसरला तिन्ही अवस्था । सद्गुरु चिंतितां चिंतनीं ॥ ४३१ ॥
देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनि अवस्था ।
येणें जालें श्रीदत्ता । तेणें हातु माथां ठेविला ॥ ४३२ ॥
हातु ठेवितांचि तत्काळ । बोधू आकळिला सकळ ।
मिथ्या प्रपंचाचें मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें ॥ ४३३ ॥

कर्म करूनि अकर्ता । तोचि अकर्तात्मबोधु जाला देता ।
देहीं असोनि विदेहता । तेही तत्वता आकळिली ॥ ४३४ ॥

गृहाश्रमू न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां ।
निजव्यापारीं वर्ततां । बोधू सर्वथा न मैळे ॥ ४३५ ॥

तो बोधू आकळतां मना । मन मुकले मनपणा ।
अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥ ४३६ ॥

त्यासी सावध करूनी तत्वता । म्हणे प्रेमा राहे सत्वावस्था ।
तोही गिळोनि सर्वथा । होयीं वर्तता निजबोधें ॥ ४३७ ॥

पूजाविधी करोनियां । जंव जानार्दनू लागला पायां ।
तंव अदृश्य जाला दत्तात्रेया । योग मायेचे नियोगें ॥ ४३८ ॥

कथेसी फांकलों सर्वथा । तो कोपून मनावा श्रोतां ।
प्रसंगे गुरु विवंचना होतां । मीही गुरुकथा बोलिलों ॥ ४३९ ॥

मज तंव चुकी पडिली मोठी । चुकूनि सांगितली गुरुगोठी ।
तेही संस्कृत नव्हे मराठी । वृथा चावटी न म्हणावी ॥ ४४० ॥

जो असेल गुरुभक्त । तो हे जाणेल मनोगत ।
जो गुरु स्मरणें सदोदित । त्यासी हें हृद्गत कळेल ॥ ४४१ ॥

ज्यासी गुरुचरणीं श्रद्धा गाढी । ज्यासी गुरु भजनीं अति आवडी ।
जिहीं गुरुप्रेम जोडिले जोडी । तेहे गोडी जाणती ॥ ४४२ ॥

ज्या सद्गुरुचें नांव घेतां । चार मुक्ती वोडविती माथा ।
मुक्ति नावडे गुरुभक्तां । नित्य मुक्तता गुरु चरणीं ॥ ४४३ ॥

ज्याचें घेतां चरण तीर्थ । चारी मुक्ती पवित्र होत ।
पायां लागती पुरुषार्थ । धन्य गुरुभक्त त्रिलोकीं ॥ ४४४ ॥

चैतन्य नित्य निराधार । निर्धर्मक निर्विकार ।
त्याचा केला जीर्णोद्धार । सत्य साचार जगद्गुरू ॥ ४४५ ॥